बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
पुण्यभूमी
संपादकःबाळासाहेब मस्के

# गुस्ताखी बर्दाश्त नही करेंगे!




लाजा वाटू द्या,इम्तियाज जलील यांच्या तिरंगा रॅलीत कसलेही राजकारण नाही!

रामगिरी महाराज,नितेश राणेंना अटक करा

मुस्लिमांच्या रॅलीने समृद्धी महामार्ग झाला ठप्प

३० किमी पर्यंत लागल्या वाहनांच्या लांब रांगा



## हाइलाइट्स

- रामगिरी-राणेंच्या वक्तव्यावर -IMIM चा महाराष्ट्रात मोर्चा
- इम्तियाज जलील यांच्या नेतृत्वाखाली तिरंगा संविधान रॅली मुंबईत पोहोचली
- तिरंगा रॅलीत संपूर्ण महाराष्ट्रातून मोटारींचा ताफा सहभागी झाला होता.
- सोमवारी सायंकाळी झालेल्या तिरंगा रॅलीमुळे मुंबईतील रस्ते जाम झाले

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

भारतीय संविधान सर्वांना समता, स्वतंत्रता आणि बंधुभाव शिकवते. मात्र काही समाजद्रोही लोक जानिवपूर्वक बेताल वक्तव्य करुन चिखलफेक करत आहेत.त्यामुळे देशाचा बंधुभाव धोक्याचा सापडला आहे. मुस्लिम धर्म यांच्या विरोधात बेताल वक्तव्य करणारे रामगिरी महाराज आणि नितेश राणे यांना सरकारकडून अभय दिले जात आहे. ही बाब सामाजिक सलोख्यासाठी चिंतेची आहे. समाजामध्ये दुही माजविणाऱ्या लोकांना संरक्षण दिले जात असेल तर समाज सुरक्षित राहणार नाही. म्हणून औरंगाबाद येथून मुंबई मंत्रालय अशी तिरंगा रॅली काढून न्याय, हक्क अधिकार मागणार आहोत. त्यामुळे यात कोणतेही राजकारण नाही. अशी स्पष्ट भूमिका माजी खा.इम्तियाज जलील यांनी स्पष्ट केली.मुस्लिम समाजाने आज खऱ्या अर्थाने एकजुटीची ताकद दाखविली राजकीय जोडी बाजूला ठेवून आणि गट तट मतभेद विसरून मुस्लिम समाज लाखोच्या संख्येने मुंबईत येऊन धडकला आहे. औरंगाबाद येथून निघालेल्या हजारो गाड्यांच्या ताफ्यामुळे समृद्धी महामार्ग ठप्प झाला होता. तब्बल ३० किलोमीटर पर्यंत गाड्यांच्या रांगा लागल्या होत्या. प्रत्येक गाडीला तिरंगा झेंडा आणि वाचाळवीराविरुद्ध गगनभेदी घोषणा देत सहभागी झालेला मुस्लिमाजाने राज्य सरकारकडून न्यायाची अपेक्षा केली आहे.या ऐतिहासिक रॅलीतून हजरत मोहम्मद पैगंबर (स.अ.) यांच्या विषयी अपशब्द वापरणाऱ्या रामगिरी महाराजासह मुस्लिम समाजाबद्दल द्वेष भावनेतून बोलणाऱ्या नितेश राणेलाही अटक करा.अशी मागणी लाखोच्या जनसमुदायाकडून करण्यात आली. दरम्यान इतिहासात पहिल्यांदाच मुस्लिम समाज कोणत्याही झेंड्याखाली संघटने सोबत न येता समाजासाठी एकत्र आल्याचे चित्र राज्यभरात पाहायला मिळत आहे. लाखोच्या संख्येने निघालेल्या या तिरंगा रॅलीला अख्खा महाराष्ट्र उड्या डोळ्यांनी पाहतोय. मुस्लिम समाजातही एकजुटीची क्रांती या तिरंगा रॅलीच्या माध्यमातून पाहायला मिळत असून मुस्लिम एकता जिंदाबाद असा नारा राज्यभर घुमू लागला आहे.

## अपमानास्पद टिप्पण्या केल्याचा आरोप

अल्पसंख्याकांविरोधात अपमानास्पद बोलणारे भाजप नेते नितीश राणे यांच्यावर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कारवाई करावी, अशी मागणी इम्तियाज जलील यांनी केली आहे. याशिवाय जलील यांना हिंदू संत रामगिरी महाराज यांच्यावरही कारवाई करायची आहे. जलील यांनी अलीकडेच इस्लाम आणि प्रेषित मुहम्मद यांच्या विरोधात अपमानास्पद टिप्पणी केल्याचा आरोप केला आहे. महाराष्ट्रात माजी केंद्रीय मंत्री नारायण राणे यांचे पुत्र नितीश राणे यांच्यावर मुस्लिमांना लक्ष्य करून वक्तव्य केल्याप्रकरणी अनेक गुन्हे दाखल आहेत. मुंबई चलो मोर्चाचा ताफा राजधानीत पोहोचला तेव्हा रस्त्यांवर जाम होता. त्यामुळे वाहतूक कोंडी झाली होती. या मोर्चात त्यांनी आपल्या वाहनांमध्ये तिरंगा झेंडे लावले होते.

## तो फक्त एकटाच निघाला, सगळेच निघाले तर काय होईल!

रामगिरी महाराज, आणि नितेश राणे यांनी बेताल वक्तव्ये करुन महाराष्ट्राचा सामाजिक बंदुभाव बाधित केला आहे. त्यामुळे या दोघांवर योग्य ती कारवाई करावी, यासाठी एकटे इम्तियाज जलील निघाले आहेत. त्यांची गर्दी पाहून सरकारला नक्कीच धडकी भरली असेल.करणं एकटा माणूस एवढी गर्दी आणू शकतो, अन्य मुस्लिम नेतेही एकत्रित आले तर त्या गर्दीला मोजता येणार नाही.

## वारिस पठाणने व्हिडिओ शेअर केला आहे

रामगिरी आणि नितेश राणे यांच्यावर कारवाईच्या मागणीसाठी काढण्यात आलेल्या मुंबई चलो मार्चच्या शेवटच्या मुक्कामावर पोहोचल्यानंतर वारिस पठाण यांनी एक व्हिडिओ शेअर केला आहे आणि लिहिले आहे की, आज आमच्या हुजूर मोहम्मद मुस्तफा सल्लल्लाहो अलैही यांच्यासाठी मुंबईत माथ्यावरचा पूर आला आहे ओ वसल्लमचे प्रेम. पाठासोबत औरंगाबादचे माजी सणसौ इम्तियाज अली हेही यावेळी उपस्थित होते.

## गेवराईमध्ये मुस्लिम रॅलीचे स्वागत

रामगिरी महाराज आणि नितेश राणे यांच्या बेताल वक्तव्याला लगाम लावण्यासाठी आणि त्यांच्यावर योग्य ती कारवाई होण्यासाठी राज्यभरातील मुस्लिम समाज सोमवारी मुंबईच्या दिशेने निघाला. त्यामुळे औरंगाबाद येथून निघणाऱ्या रॅलीत बीडचे हजारो मुस्लिम बांधव सहभागी झाले होते. या मुस्लिम बांधवांचे गेवराई येथे बाळासाहेब मस्के यांनी स्वागत करून मुस्लिम समाजाच्या न्याय, हक्क आणि अधिकारासंदर्भात आपला पाठिंबा आहे. सर्व समाजांच्या प्रश्नांसाठी आमची भूमिका नेहमीच सकारात्मक राहिलेली आहे. त्यामुळे त्यांच्या आंदोलन, मोर्चात आमचा सहभाग राहिलेला आहे. इथून पुढेही आमची सामाजिक भूमिका आम्ही बजावत राहणार आहोत. असा शब्द बाळासाहेब मस्के यांनी यावेळी मुस्लिम समाज बांधवांना दिला. या रॅलीत शेख शफीक भाऊ यांच्यासह विविध दैनिकांचे संपादक आणि मुस्लिम समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी होतात.






## नेक इम्तियाज जलील यांनी...

हजरत मोहम्मद पैगंबर (स.अ.) यांच्या बाबतीत वादग्रस्त आणि चुकीचे विधान करणाऱ्यांवर कारवाई करावी.यासाठी लाखो लोकांसोबत मुंबईकडे निघालेले इम्तियाज जलील यांचे स्वागत करण्यासाठी कार्यकर्त्यांनी हारतुरे आणले.मात्र त्यांनी ते हार-तुरे नाकारले.आम्ही सरकार दरबारी न्याय मागण्यांसाठी जात आहोत, राजकारण करण्यासाठी नाही.त्यामुळे कोणतेही स्वागत,सत्कार घेणार नाही अशी भूमिका जलील यांनी घेतली.

# केजरीवाल यांचा जुगार

मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देऊन पुन्हा जनतेकडे कौल मागणारे अरविंद केजरीवाल हे देशातील एकमेव मुख्यमंत्री असावेत. शेकडो कोटी रुपयांच्या मद्य घोटाळ्याच्या आरोपावरून त्यांच्यावर ईडी आणि सीबीआयकडून चौकशी चालू आहे. तब्बल १७७ दिवस तिहारच्या तुरुंगात काढल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने त्यांची जामिनावर मुक्तता केली आणि जेलमधून बाहेर पडताच त्यांनी मुख्यमंत्रीपदाचा दोन दिवसांत राजीनामा देणार असल्याची घोषणा केली. दि. १७ सप्टेंबरला त्यांनी दिल्लीचे उपराज्यपाल विनय सक्सेना यांची भेट घेऊन मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा सुपूर्द केला आणि आम आदमी पक्षाच्या दिल्ली विधिमंडळ पक्षाच्या आमदारांनी आतिशी यांची एकमताने नेता म्हणून निवड केल्याचे पत्रही उपराज्यपालांना दिले.


केजरीवाल यांनी आपला वारस म्हणून आतिशी यांना पसंती दिली. आता अरविंद केजरीवाल हे माजी मुख्यमंत्री आहेत, सरकारमध्ये ते कोणत्याही पदावर नाहीत, हरियाणाच्या विधानसभा निवडणुकीत ते आपच्या उमेदवारांच्या प्रचारात भाग घ्यायला ते मोकळे आहेत. तसेच दिल्ली विधानसभेची निवडणूक महाराष्ट्राबरोबर नोव्हेंबर महिन्यात घेण्यात यावी, अशी त्यांनी निवडणूक आयोगाकडे मागणी केली आहे. मी गुन्हेगार आहे की प्रामाणिक आहे, हे दिल्लीतील जनतेने ठरवावे. मी दोषी आहे की निरपराध आहे, हे दिल्लीतील मतदारांनी निवडणुकीत सांगावे अशी त्यांनी भूमिका मांडली आहे. मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देऊन जनतेकडे कौल मागण्यासाठी त्यांनी जुगार खेळला आहे.

१७ सप्टेंबरला पंतप्रधान नरेंद्र मोदींचा ७४ वाढदिवस होता, त्याच दिवशी केंद्रातील एनडीए सरकारला १०० दिवस पूर्ण झाले. तोच दिवस निवडून केजरीवाल यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला व देशभरात मीडियामध्ये ठळक प्रसिद्धी मिळवली. राजकारणात सत्ता हे सर्वस्वी असते. ज्यांना सत्ता मिळते, त्यांना मुख्यमंत्रीपद हे सर्वस्व वाटत असते. मुख्यमंत्रीपदासाठी दुसरे कोण स्पर्धक नकोत म्हणून प्रत्येक राजकीय नेता सतर्क असतो. मुख्यमंत्रीपदासाठी सर्व पैसा, प्रतिष्ठा व ताकद पणाला लावणारे अनेक आहेत. मुख्यमंत्रीपद मिळावे म्हणून हायकमांडला साकडे घालतात, पक्षाच्या आमदारांना आमिषे दाखवतात, आमदार दुसरीकडे जाऊ नयेत म्हणून त्यांना दुसऱ्या राज्यात नेऊन रिसॉर्ट किंवा पंचतारांकित हॉटेलवर नेऊन ठेवतात. पण आपल्या पाठीशी पक्षाचे भक्कम बहुमत असतानाही मुख्यमंत्रीपदाचा त्याग करणारे अरविंद केजरीवाल देशात एकमेव नेता असतील. केजरीवाल यांच्या निर्णयाने पक्षाला पुन्हा तेज येईल, कार्यकर्ते सक्रिय होतील, पक्षाला आलेली मरगळ झटकली जाईल, ज्या दिल्लीकरांनी लोकसभा निवडणुकीत दिल्लीतील सर्व ७ जागांवर भाजपाला निवडून दिले, ते मतदार विधानसभा निवडणुकीत पुन्हा आपकडे आकर्षित होतील, अशी गणिते मांडली जात आहेत.

मद्य घोटाळ्यातील आरोपी असणारे केजरीवाल यांनी खरे तर ईडीने अटक केल्यावरच राजीनामा द्यायला हवा होता. रांचीमध्ये हेमंत सोरेन यांच्याकडे ईडीची तुकडी धडकली तेव्हा लगेचच झारखंडच्या मुख्यमंत्रीपदाचा त्यांनी राजीनामा दिला होता, मग जेलमध्ये गेल्यावरही केजरीवाल सहा महिने मुख्यमंत्रीपदाला का चिकटून राहिले? केजरीवाल यांना मुख्यमंत्रीपदाच्या खुर्चीचा मोह सुटत नाही असा त्यातून संदेश गेला. येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत अँटी इन्कबन्सीचा फटका बसू नये म्हणून केजरीवाल यांनी जेलमधून बाहेर येताच मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देण्याची धूर्त खेळी खेळली आहे. सर्वोच्च न्यायालयाने केजरीवाल यांची जामिनावर सुटका केली असली तरी त्यांच्यावर काही कडक निर्बंध लादले आहेत. ते मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयात जाऊ शकत नाहीत, मुख्यमंत्रीपदाच्या खुर्चीवर बसू शकत नाहीत. मुख्यमंत्री म्हणून कोणत्याही फाईलवर स्वाक्षरी करू शकत नाहीत. शेवटी मुख्यमंत्रीपद कागदावरच राहणार असेल तर त्याचा उपयोग तरी काय ?

# पहिली संस्था सत्यशोधक समाज!

एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रात सामाजिक सुधारणा घडत गेल्या ,यामध्ये अनेक समाजसुधारकांचे महत्त्वाचे योगदान आहे. एकोणिसाव्या शतकामध्ये वेगवेगळे मतप्रवाह असलेल्या विचारांच्या व्यक्ती समाजात काम करीत असत . यामध्ये ब्राह्मणांचे वर्चस्व कायम राहावे व ब्राह्मणी तर लोकांनी त्यांची सेवा करावी हे मनोधारणा आणि पेशवाईच्या काळामध्ये ब्राह्मणांचे वाढते वर्चस्व कायम राहावे यासाठी काही कर्मठ संस्था माणसे काम करीत असत. तर दुसरीकडे समाजातील प्रत्येक घटकाला सामान न्याय, समता प्रस्थापित होण्यासाठी थोर समाज सुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांनी संघर्ष केला. या संघर्षामध्ये त्यांना विविध ब्राह्मणी विचारांच्या लोकांनी खूप छळले. मात्र, बहुजन समाजात शिक्षणाची ज्योत निर्माण करण्यासाठी महात्मा फुले यांनी उचललेले शिवधनुष्य कोणत्याही परिस्थितीत पेलले. त्यांचीच फळे आजच्या बहुजन समाजाला चाखायला मिळत आहेत. सप्टेंबर २४, इ.स. १८७३ रोजी महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.सत्यशोधक समाजाचे पहिले अध्यक्ष आणि खजिनदार महात्मा जोतिबा फुले हेच होते. समाजातील विषमता नष्ट करणे व तळागाळातील समाजापर्यंत शिक्षण पोहचवणे हे सत्यशोधक समाजाचे मुख्य ध्येय होते.




सत्यशोधक समाजाच्या कार्यासाठी म. फुले यांनी घटना बनविली. नियमावली तयार केली. मूलतः सत्यशोधक समाज एकच निर्मिक, एक धर्म, एक मनुष्यजात मानणारा म्हणून स्थापन झाला होता .त्याची आचारसंहिता सार्वजनिक सत्यधर्म या ग्रंथात दिसते .त्यात ढोबळ नियम सांगितले आहेत. त्यानुसार समाजाच्या कार्यकारिणीत सुरुवातीस म. जोतीराव फुले हे चिटणीस आणि डॉ. विश्राम रामजी घोले हे अध्यक्ष असायचे. वर्षातून कार्यकारिणीच्या सर्वसाधारण चार सभा, लोकशाही पद्धतीने कार्यकारी मंडळाची निवड व बहुमताने निर्णय, अशी सर्वसाधारण सूत्रे सत्यशोधक समाजाची होती. तत्कालीन काळातही लोकशाही मार्गाने महात्मा फुले यांनी सामाजिक सुधारणा केल्या.महात्मा ज्योतिबा फुले यांनी सत्यशोधक समाजासाठी काही नियम केले होते.जे समाजाच्या उन्नतीसाठी मार्गदर्शक होते.ईश्वर एक असून तो सर्वव्यापी, निर्गुण, निर्विकार व सत्य रूप आहे आणि सर्व माणसे त्याची लेकरे आहेत. या निर्मात्याशिवाय मी इतर कशाचीही पूजा करणार नाही. निर्मिकाची भक्ती करण्याचा पूर्ण अधिकार प्रत्येकाला आहे. त्यासाठी पुरोहित किंवा मध्यस्थाची आवश्यकता नाही. माणूस जातीने श्रेष्ठ ठरत नसून गुणांनी श्रेष्ठ ठरतो.निर्मिक सावयव रूपाने अवतरत नाही.पुनर्जन्म, परलोक, मोक्ष, कर्मकांड, जप-तप या गोष्टी अज्ञान मूलक आहेत त्यांचा अवलंब माझ्याकडून होणार नाही. जनावरांना मारण्यात मी सहभागी होणार नाही. दारूच्या व्यसनापासून अलिप्त राहण्याचा मी प्रयत्न करीन आणि तसेच समाजाचा खर्च चालावा म्हणून मी माझ्या उत्पन्नातून काही वर्गणी देईन.ही मानवाच्या कल्याणाची तत्व त्यांनी सत्यशोधक समाजाला दिली.



पदमाकर उखळीकर,
मो.९९७५१८८९१२

सत्यशोधक समाज ही संस्था पहिली परिवर्तनाची चळवळ उभी करणारी संस्था होय. जमीनदार, शेटजी व पुरोहितांकडून होणाऱ्या अन्याय, अत्याचारापासून, गुलामगिरीतून शूद्रातिशूद्र समाजाची मुक्तता करणे व त्यांना हक्काची जाणीव करून देणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते.मात्र , देशाची पंचाहत्तरी ओलांडली तरी बहुजन, दलित, पीडित, वंचितांवर अजूनही अत्याचार होतो. शारीरिक,मानसिक, आर्थिक विषमता अजूनही दिसते. पुन्हा गुलामगिरीची वेळ येते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. कारण एकोणिसाव्या शतकामध्ये हिंदुत्ववादी विचारसरणीच्या रूढी परंपरांना २१ व्या कायम दिसू लागल्यात.महात्मा ज्योतिबा फुले यांनी हिंदू धर्मातील अनिष्ट रूढींना विरोध करून दलित बहुजनांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणून अशा परंपरांना मुठ- माती देण्याचा प्रयत्न केला. सत्यशोधक समाज संस्थेच्या माध्यमातून समाजात पाश्चिमात्य परिवर्तनवादी विचारांचा प्रसार केला. तर या विरोधात हिंदू धर्मातील अनेक कर्मठ लोकांनी त्यांना विरोध केला मात्र महात्मा ज्योतिबा फुले यांनी सत्यशोधक समाज संस्थेच्या माध्यमातून सामाजिक समता निर्माण केली. त्यामुळे महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजाची आजही तितकीच गरज वाटते. ती समता टिकविण्यासाठी अन्यथा समरसता पेरणारी टोळी गेल्या काही वर्षांत निर्माण झाली आहे. सत्यशोधक समाजाचा अर्थ जर लक्षात घेतला तर सत्याचा शोध घेणारा समाज असा घेता येईल. परंतु देशातील असत्याशीच एकरूप होऊन असत्य लादण्याची तयारी सुरू आहे . त्याला विरोध करण्यासाठी सत्यशोधक समाज निर्माण झाला पाहिजे.आजच्या दिवशी म्हणजेच २४ सप्टेंबर १८७३ रोजी महात्मा ज्योतिराव फुले यांनी सत्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आज या संस्थेला दीडशे वर्षापेक्षा अधिक वर्षं होतायत.त्यामुळे सत्याचा शोध घेणारा समाज निर्माण व्हावा. हीच अपेक्षा!

# धनगर समाजाचा आरक्षणासाठी रस्तारोको

## आंदोलन: ट्राफिक सुरळीत करण्यासाठी पोलिसांना लागले दोन तास

माजलगाव /पुण्यभूमी प्रतिनिधी

गेल्या अनेक वर्षापासून धनगर समाजाची एसटी आरक्षणाची मागणी राज्यकर्त्यांच्या उदासीन धोरणामुळे प्रलंबित आहे या जिव्हाळ्याच्या मागणीसाठी माजलगाव तालुक्यातील सकल धनगर समाजाच्या वतीने परभणी फाटा येथे दिनांक २३ सप्टेंबर रोजी तब्बल दोन तास रस्ता रोको आंदोलन करण्यात आले या रोडवरील वाहतूक सुरळीत करण्यासाठी पोलीस प्रशासनाला तब्बल दोन लागले .

धनगर जमातीस एसटी आरक्षणाची अंमलबजावणी करावी या जिव्हाळ्याच्या मागणीसाठी पंढरपुर ,लातुर,येथे दि.९ सप्टेंबर पासून राज्यव्यापी आमरण उपोषण सुरू आहेत या आंदोलनास पाठिंबा म्हणून दि. २३ सप्टेंबर रोजी सबंध महाराष्ट्रात रास्ता रोको आंदोलन करण्याचे हाक समाजाच्या वतीने देण्यात आली होती म्हणून त्या हाकेला ओ म्हणून माजलगाव तालुक्यातील सकल धनगर समाजाच्या वतीने परभणी फाटा चौकत दि. २३ सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी १वाजेपर्यंत तब्बल दोन तास रस्ता रोको आंदोलन करण्यात आले या आंदोलनात सहभागी होऊन माजीआ. राधाकृष्ण होके पाटील, रमेशराव आडसकर, नितीनराव नाईकनवरे, राहुल जगताप, शरद यादव, यांनी मनोगत व्यक्त करून जाहीर पाठिंबा दिला आहे. तर समाजाच्या वतीने डॉ. भगवानराव सरवदे, तुकाराम येवले, विजय धायगुडे , प्रा. प्रकाश गवते, ज्ञानेश्वर सरवदे, अँड संतोष बाबरे,मुक्तीराम आबूज, राम अबुज ,राजा अर्जुन, यांनी मनोगत व्यक्त केली तर सूत्रसंचालन विशाल देवकते यांनी केलेया रस्ता रोकोला बबनराव सरवदे अण्णासाहेब वगरे विलास नेमाने,अविनाशराव कांडुरे,सुभाषराव गडदे किसनराव हराळ कल्याणराव गवते प्रभाकर धरपडे ,नारायण सातपुते, डॉ अशोक तिडके, लक्ष्मणराव गायकवाड,कल्याण कसपटे, यांच्यासह हजारो तरुण वृद्ध याआंदोलनात सहभागी झाले होते यावेळी महसूल च्या वतीने महामुनी आणि रूपचंद आभारे यांनी आंदोलनकर्त्यांचे निवेदन स्वीकारले यावेळी पोलीस निरीक्षक बालक कोळी यांनी चोक बंदोबस्त दिला होता




# पान सहा वरून

### कृषी मंत्र्यांच्या परळीत

कार्यालयावर बैलगाडी व ट्रॅक्टर मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.शेकडो बैलगाड्या,ट्रॅक्टर आणि हातात लाल झेंडे घेऊन घोषणाबाजी करणारे शेतकरी यांचा मोर्चाला परळी येथील वैद्यनाथ मंदिर परिसरातुन सुरुवात झाली. संत सेवालाल महाराज चौक, राणी लक्ष्मीबाई टॉवर, कृषी उत्पन्न बाजार समिती, एक मिनार चौक, बसस्थानक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, मौलाना अबुल कलाम आझाद चौक मार्गे सिंचन भवन समोरून उपविभागीय कार्यालयावर मोर्चा धडकला. या शेतकरी संघर्ष समितीचे घटक असलेल्या अखिल भारतीय किसान सभेचे जिल्हाध्यक्ष कॉ.एड.अजय बुरांडे, शेतकरी संघटनेचे कालिदास आपेट, अच्युत गंगणे,काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख,राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या नेत्या सुदामतीताई गुट्टे, राजेभाउ फड, राजेश देशमुख, उत्तमराव माने, किरणकाका पवार, सुनील रत्नाकर गुट्टे, एड.माधव जाधव, मच्छिंद्र जगताप, प्रभाकर वाघमोडे, कॉ. भगवान बडे, गंगाधर पोटभरे, एड.जीवनराव देशमुख कैलास सोळंके, आदींनी नेतृत्व केले. तहसील च्या प्रांगणात सुनील गुट्टे, राजेश देशमुख, राजेसाहेब देशमुख, राजाभाऊ फड, सुदामती गुट्टे, उत्तम माने आदी नेत्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर उपस्थितांना संबोधित केले.यावेळी माकपचे कॉ पी एस घाडगे, कॉ पांडुरंग राठोड यांच्या सह विविध पक्ष व संघटनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### केजमध्ये थरार,विद्यार्थी

अनुचित प्रकार विद्यार्थी घाबरुन ओरडू लागला तर हे पाहून बाजुला उभी असलेल्या महिलेनेही आरडाओरडा केली. हे ऐकून काही नागरिकांनी धाव घेतली तर दोघांनी दुचाकी चारचाकीच्या समोर लावली असता त्यांना पळता आले नाही. परंतु झटापटीत दोघे पळून जाण्यात यशस्वी झाले तर एकजण जमावाच्या हाती लागला. त्यास जमावाने चांगलाच चोप दिला. भरदिवसा रहदारीच्या ठिकाणी ही घटना घडल्याने केज शहरात खळबळ उडाली आहे. या पकडलेल्या एक अपहरणकर्त्याला पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. हा प्रकार नेमका काय ? हे पोलीस तपासात निष्पन्न होईल. पण शहरात बालके चोरणारी टोळी पकडल्याची जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

### सासरे बुवाचे जाणीवपूर्वक

वाढला आहे. दिवसागणिक शेकडो रुग्ण उपचारासाठी रुग्णालयात येऊन उपचार घेत आहेत, परंतु या ठिकाणच्या ढिसाळ नियोजनामुळे आणि अपुऱ्या उपलब्ध असलेल्या यंत्रसामग्रीमुळे त्याचा त्रास रुग्णांन होत आहे स्वाराती रुग्णालयामधील रेडिओलॉजी विभागात गेल्या काही महिन्यापासून सिटीस्कॅन मशीन बंद, एक्सरे मशीन बंद असल्याने रुग्णांची हेळसांड होत आहे. रुग्णालयात रेडिओलॉजी विभागात सोनोग्राफीसाठी दररोज २००ते ३०० रुग्ण सोनोग्राफी करण्यासाठी येतात. परंतु रेडिओलॉजी विभागात एकच सोनोग्राफी मशीन व एकच रेडिओलॉजीस्ट कार्यरत आहे एका रुग्णाची सोनोग्राफी करण्यासाठी किमान दहा ते पंधरा मिनिटांचा कालावधी लागतो, अपुऱ्या मनुष्यबळामुळे सोनोग्राफी विभागावर ताण पडत असल्यामुळे कार्यरत असणाऱ्या रेडिओलॉजिस्ट रुग्णांना असभ्य भाषेचा वापर करतात. यामुळे स्वाराती प्रशासनाने तात्काळ रेडिओलॉजी विभागातील सोनोग्राफी अभावी रुग्णांची होणारी हेळसांड थांबवावी व संबंधित रेडिओलॉजिस्ट यांना समज द्यावी अशी मागणी रुग्णांकडून व त्यांच्या नातेवाईकाकडून केली जात आहे स्वाराती' चा रेडिओलॉजी विभाग बंद पडण्याच्या मार्गावर स्वाराती रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयातील रेडिओलॉजी विभागाची एकेकाळी मोठी क्रेझ होती. विभागात डिप्लोमा कोर्सेस करण्यासाठी निवासी डॉक्टर मोठ्या प्रमाणात उपलब्ध असायचे परंतु हळूहळू घर घर लागल्याने रेडिओलॉजी विभागाचे एमडी व डिप्लोमा कोर्सेस बंद पडले त्यानंतर हे कोर्सेस एमसीआयच्या मानांकानुसार पुन्हा सुरू करण्यासाठी प्रयत्न झाले नाहीत. आत्ताही रेडिओलॉजी विभागातील सिटीस्कॅन मशीन बंद वारंवार पडणारे एक्स-रे मशीन बंद, अपुरे डॉक्टर्स, अपुरे कर्मचारी, सोनोग्राफी मशीनची कमतरता यामुळे सातत्याने हा विभाग गाजत आहे. स्वाराती प्रशासनाने वेळीच या रेडिओलॉजी विभागातील समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला नाही तर काही दिवसातच हा विभाग पूर्णतः बंद पडल्याशिवाय राहणार नाही

### संसदेलाच निर्णय घेण्याचा

राज्य चालवण्यासाठी सर्वांचा सहभाग असला पाहिजे. ज्यांना वैदिक पद्धतीने नाकारण्यात आले होते, त्यांना आरक्षणाच्या माध्यमातून स्थान देण्याची तरतूद संविधानात करण्यात आली आहे. इथे एससी आणि एसटी यांची संविधानिक कमिटी आहे. या संविधानिक कमिटीला एससी आणि एसटी यांची परिस्थिती सुधारली आहे का ? याचा अभ्यास करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. कोणत्याही एससी आणि एसटी कमिशनने असे कुठेही नमूद केले नाही की, एससी आणि एसटी यांची परिस्थिती ७० वर्षांत पाहिजे तशी झाली आहे असे कुठेच नमूद केलेले नाही. याबाबत आम्ही सुप्रीम कोर्टाच्या न्यायधीशांसमोर मत मांडणार असल्याचेही ड. आंबेडकर यांनी म्हटले आहे. कोर्टाने सुमोटो म्हणजेच आपल्यावर जबाबदारी घेऊन काही जणांच्या पीटिशनवर क्रिमीलेयर आणि आरक्षण वर्गीकरणावर जे जजमेंट दिले आहे. ते देशाच्या मूलभूत संरचनेच्या विरोधात असल्याचे मत आंबेडकर यांनी व्यक्त केले. आरक्षण हे विकासाचे साधन नाही, तर ते प्रतिनिधित्व देण्याचे साधन असल्याचे म्हणत त्यांनी सुप्रीम कोर्टाच्या निर्णयावरही निशाणा साधला ते म्हणाले की, क्रिमीलेयर आणि आरक्षण वर्गीकरणाच्या संदर्भातील सुप्रीम कोर्टाचे जजमेंट हे देशाच्या एकतेवरच हल्ला करत आहे.

### कर्मचारी पतसंस्था मोठा

आणि संचालक मंडळाचे कौतुक केले. या कर्मचारी संस्थेमुळे कर्मचाऱ्यांना हक्काचा आधार मिळत असल्याचे म्हटले. कार्याचा आणखी विस्तार वाढवून बदलत्या काळानुसार विविध उपक्रम राबविण्यात यावेत, असे मत व्यक्त करत पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. तसेच, डॉ. दीपा क्षीरसागर यांनी अध्यक्षीय भाषणात मार्गदर्शन करत संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे कौतुक केले. या सर्वसाधारण सभेचे बालासाहेब चवार यांनी प्रास्ताविक करताना कामकाजावर प्रकाश टाकून वार्षिक अहवाल सादर केला. यावेळी सर्व मान्यवरांचे कर्मचारी संस्थेच्यावतीने सत्कार करण्यात आला. सुत्रसंचलन शेख ताजुद्दीन यांनी केले. ही सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. यावेळी सभासद, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### धनगर समाज उतरला

तो म्हणजे एसटी प्रवर्गातून आरक्षण,आम्ही सरकारला विनंती करतो की आमच्या संयमाची परीक्षा घेऊ नका. उशीर झाल्यास आम्हाला आंदोलन अधिक तीव्र करावे लागेल आणि परिणामास सरकार जबाबदार असेल. वर्दळीच्या रस्त्यावर सुमारे एक तास हे आंदोलन चालल्याने परळी-वैद्यनाथ येथील ईटके कॉर्नर येथे दोन्ही बाजूंची वाहतूक कोंडी झाली होती. तहसीलदार यांना समाज बांधवांनी आपल्या मागण्यांचे निवेदन दिले. यावेळी धनगर समाजाचे युवा नेते शिवदास बिडगर, विकास बिडगर, दिलीप बिडगर, माऊली गडदे, भिवा बिडगर, विश्वनाथ देवकते, चंद्रकांत देवकते, भिमराव सातपुते, माऊली धायगुडे, मुंजा फुके, प्रविण बिडगर, लक्ष्मण कावळे, कपिल गाडेकर, नवनाथ दाणे, दादाराव गडदे, महादेव हाके, शाम सरवदे, गणेश देवकते, गोविंद यमगर, अंगद देवकते, रामभाऊ कोपणर, महादेव गडदे, चंद्रकत बिडगर, गोपाळ बिडगर, शिवाजी कुकर, सुग्रीव बिडगर, शाम सरवदे, परमेश्वर वैद्य, श्रीहरी कामाळे, हनुमंत कामाळे, व्यंकटेश हरणावळ व सकल धनगर समाज परळी-वैद्यनाथ जिल्हा बीड यांनी केले आहे. तसेच बंजारा समाजाचे युवा नेते बाळासाहेब (पपू ) चव्हाण व माळी समाजाचे नेते विलास आढाव यांनी आरक्षनास पाठींबा दिला. यावेळी संभाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे यांच्या नेतृत्वात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

### ऐतिहासिक सत्कार सोहळ्यात

रोजी बीड शहरात होणाऱ्या केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या ऐतिहासिक सत्कार सोहळ्यात शहरातील रिपाइं पदाधिकारी, महिला शाखा प्रमुख, क्रियाशील सदस्य व कार्यकर्ते यांनी हजारोच्या संख्येने सामील होऊन शक्ती प्रदर्शन करावे अशी आवाहन बीड शहर अध्यक्ष अविनाश जोगदंड, प्रभाकर चांदणे, दिलीप खंदारे, श्याम वीर, अक्षय कोकाटे, विलास जोगदंड, भैय्यासाहेब मस्के, महेंद्र वडमारे, आप्पा मिसळे, भैय्यासाहेब साळवे, गौतम कांबळे, संजय हनवते, दीपक कांबळे,सिद्धार्थ वडमारे आदींनी केले आहे.

### सरकारने धनगर आरक्षण

आमचा हक्क हवा आहे जो भारतीय संविधानाने दिलेला आहे आणि तो म्हणजे एसटी प्रवर्गातून आहे. असे म्हणत मयुरींताई बाळासाहेब मस्के-खेडकर यांनी धनगर आरक्षण देण्याची मागणी केली. यांनी धनगर समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी होता.

### बीड आयटीआयला विनायकराव

नूतनीकरण, पिण्याचे पाण्याची व्यवस्था याबरोबरच अनेक समस्या सोडवण्याचे काम त्यांनी केले होते. त्यांच्या अकाली निधनानंतर त्यांच्या कार्याला स्मरून आज राज्य सरकारने बीड येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला लोकनेते विनायकराव मेटे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था असे नामकरण करण्यावर शिक्कामोर्तब केला, यानंतर शिवसंग्रामच्या कार्यकर्ते, पदाधिकारी व लोकनेते विनायकराव मेटे यांच्यावर प्रेम करणा-या चाहत्यांनी एकत्र येत शिवसंग्राम भवन येथे आनंद व्यक्त केला आणि लोकनेते विनायकराव मेटे यांच्या स्मृतिस्थळी जाऊन आदरांजली अर्पण करत अभिवादन केले. याप्रसंगी शिवसंग्रामचे प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, जिल्हाध्यक्ष नारायणराव काशीद, जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे,शहराध्यक्ष सुहास पाटील मनोज जाधव, सचिन कोटुळे शेषराव तांबे,डॉ. राजेंद्र बंड,योगेश शेळके,सुनील कुटे, ज्ञानेश्वर कोकाटे, हनुमंत पवार,मच्छिंद्र कुटे, शेख आबेद, अक्षय माने, राजेंद्र आमटे,अमजद पठाण, शेख लालाभाई,,शैलेश सुरवसे, हरिश्चंद्र ठोसर, प्रशांत डोरले, राहुल शाहगडकर ,मुकुंद गोरे,राजेश माने,गणेश धोंडरे,कैलास शेजाळ,गणेश साबळे, विजय सुपेकर,सुहास मेटे,कुंदन गायकवाड,हरीश शिंदे,

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# ...अखेर उपोषणातून सुटला प्रश्न!

## सामंजस्य — सभापती डक यांनी मध्यस्थी करत

माजलगाव/पुण्यभुमी प्रतिनिधी

माजलगाव ते मंजरथ रस्त्याचे काम अंदाज पत्रकानुसार करण्यात यावे या मागणीसाठी शिवसंग्रामचे तालुकाध्यक्ष उत्तम पवार यांनी मराठवाडा मुक्तीदिनी गावकऱ्यांसह उपोषणास सुरुवात केली होती. उपोषणाच्या सातव्या दिवसी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक डक यांनी उपोषण स्थळी उपोषणकर्त्यांची भेट घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना यावेळी फैलावर घेतले.दरम्यान लेखी आश्वासनाने व अशोक डक यांच्या मध्यस्थीने उपोषणकर्त्यांने उपोषण मागे घेतले आहे.

दक्षिण काशी म्हणून पंचक्रोशीत लौकिक असलेल्या मंजरथ या गावचा रस्ता पंतप्रधान ग्रामीण सडक योजनेतून सुरू करण्यात आला आहे.१० कोटी ७० लाख रुपये या कामावर खर्च करण्यात येत आहे.परंतु या रस्त्यावर अत्यंत थातूरमातूर पद्धतीने काम करण्यात येत आहे.कामावर कोणत्याही अधिकार्याचे लक्ष नाही.अंदाज पत्रकानुसार काम करण्यात येत नाही.गावाचे महत्त्व पाहता या गावात दशक्रियेसाठी दररोज या रस्त्यावरून शेकडो वाहनाची येजा होते.परंतु याचं कुठलंही गांभीर्य संबंधित गुत्तेदाराला नाही.ही बाब शासनाच्या निदर्शनास आणण्यासाठी शिवसंग्रामचे तालुका अध्यक्ष उत्तम पवार यांनी गावकऱ्यांना सोबत घेऊन १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्तीदिनी आमरण उपोषणास सुरुवात केली आहे. आज उपोषणाचा सातवा दिवस आहे.परंतु अद्याप कोणीही अधिकाऱ्याने या उपोषणास भेट दिली नाही.सोमवारी दि.२३ रोजी मुंबई बाजार समितीचे सभापती अशोक डक यांनी उपोषण स्थळी भेट दिली.उपोषणकर्त्यांची अस्तेवायीक चौकशी केली. तहसीलदार संबंधित अधिकाऱ्यांना उपोषणस्थळी बोलावून घेतले. संबंधित प्रश्नाविषयी त्यांना धारेवर धरत तात्काळ उपाययोजना करण्याचे लेखी आश्वासन घेतले. त्यामुळे डक यांच्या मध्यस्थीने उपोषण करते उत्तम पवार यांनी आपले ७ दिवसापासून सुरू असलेले उपोषण मागे घेतले. यावेळी माजी सभापती संभाजी शेजुळ यांची उपस्थिती होती.




### सर्वच रस्ता कामे बोगस:अशोक डक

माजलगाव मतदार संघात रस्ता कामासाठी करोडो रुपयांचा विकास निधी आलेला आहे.ठीक ठिकाणी कामे सुरू आहेत.परंतु ही सर्वच कामे बोगस,दर्जाहीन करण्यात येत आहेत.अधिकाऱ्यांचे या कामावर लक्ष नाही.त्यामुळे गुत्तेदाराकडून मुजोरी करण्यात येते.दादागिरी सुरू आहे. अशा बोगस कामाविरोधात रस्त्यावर उतरणार असल्याचे मुंबई बाजार समितीचे सभापती अशोक डक यांनी सांगितले.

# अजिंठा डोंगरात धुव्वाधार पाऊस

## अस्मानी:खटकाळी नदीला आला पून्हा पूर



घोसला/पुण्यभूमी प्रतिनिधी

घोसला शिवाराला लागून असलेल्या अजिंठा डोंगर परिसरात तासभर झालेल्या धुव्वाधार पावसाने घोसला गावाच्या खटकाळी नदीला सायंकाळी सहा वाजता पूर आला त्यामुळे सोयगाव ते बनोटी वाहतूक ठप्प झाली होती दरम्यान अजिंठ्याच्या डोंगरात झालेल्या पावसाने घोसला गावाच्या खटकाळी नदीला मोठा पूर आला आहे

घोसला शिवारात निमखेडी,बहुलखेडा, उमर विहिरे, नांदगाव नांदगाव तांडा या परिसरात पाच ते दहा मिनिटे किरकोळ पाऊस झाला परंतु या परिसरात लागून असलेल्या अजिंठा डोंगरात झालेल्या तासभर चया धुव्वाधार पावसाने मात्र गावाची नदी दुथडी भरून वाहत होती गावात किरकोळ पाऊस असताना अचानक आलेल्या या पुरामुळे ग्रामाथांच्या भुवया उंचावल्या होत्या मात्र घोसला परिसरात झालेल्या या दहा मिनिटाच्या पावसाने वेचणी वर आलेला कापूस भिजला होता त्यामुळे पुन्हा नुकसानीने तोंड वर काढले आहे.

# पैठणमध्ये मराठा समाजाचे आंदोलन

## आक्रमक: तालुका बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद



पैठण/पुण्यभूमी प्रतिनिधी

मराठा आरक्षण संघर्ष योद्धा मनोज जरांगे पा यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी सकल मराठा समाजाच्या वतीने पैठण तालुका बंदची हाक देण्यात आली होती. सोमवार रोजी सकाळी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरातून बाईक रॅली काढून पाचोड फाटा येथे भव्य रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी उपस्थित सकल मराठा समाजाच्या वतीने राज्य शासनाचा निषेध करून मराठा आरक्षण संघर्ष योद्धा मनोज जरांगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आलेल्या लढ्याला सर्व स्तरातून सहभाग होऊन पाठिंबा व्यक्त करावा. यावेळी राज्य शासनाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात येऊन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी चालवलेल्या प्रकाराचा निषेध करण्यात आला.

दरम्यान या रास्ता रोको आंदोलनामुळे छत्रपती संभाजीनगर, पाचोड, शेवगाव, गेवराई येथील येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांच्या दुतर्फा लांबच लांब रांगा लागल्या होत्या. कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सिद्धेश्वर भोरे, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संजय देशमुख, पोलीस उपनिरीक्षक दशरथ बुरुकुल, एकनाथ नागरगोजे, संजय मदने, गोपनीय शाखेचे मनोज वैद्य, नरेंद्र अंधारे, राजेश आटोळे, यांनी विशेष बंदोबस्त ठेवला होता. या बंदला छोट्या मोठ्या व्यापाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विद्यार्थी व शासकीय कार्यालयामध्ये दररोज ये-जा करणाऱ्या कर्मचाऱ्यांची वाहना व बस सेवा काही प्रमाणावर बंद असल्याने चांगलीच फजिती निर्माण झाली होती. रास्ता रोको आंदोलनाला मराठा समाजाची युवक तरुणांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला आहे. दरम्यान सकल मराठा समाजाचा आंदोलन पैठण शहरात सुरू असल्याने धनगर समाजाच्या वतीने लक्ष्मण हाके यांना पाठिंबा देण्यासाठी तालुक्यातील पिंपळवाडी पिं येथील परिसरात धनगर समाजाच्या वतीने आंदोलन करून विविध मागणीचे निवेदन एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सपोनि ईश्वर जगदाळे, मंडळ अधिकारी सोनवणे यांना धनगर समाजाच्या मागणीचे निवेदन देण्यात आले. यावेळी धनगर समाजातील विविध मान्यवर सह तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खरेदी केंद्र तात्काळ सुरु करावेत

## आ. पंकजा मुंडे: खरेदीचे अधिकार मार्केट कमिटीला देण्याची मागणी

बीड/पुण्यभिमी प्रतिनिधी



शासनाने जिल्हयात आधारभूत किंमत दराने सोयाबीन खरेदी केंद्र तात्काळ सुरू करून सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा द्यावा आणि खरेदीचे अधिकार मार्केट कमिटीला द्यावेत अशी मागणी भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांनी केली राज्य सरकारकडे पत्राद्वारे केली आहे.

जिल्हयात सोयाबीनचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते, शेतकरी याकडे नगदी पीक म्हणून पाहतात. सध्या जिल्हयात पावसाचे प्रमाण वाढले आहे त्यामुळे सोयाबीन पीक खराब होण्याची भीती शेतकऱ्यांना आहे. त्यामुळे शेतमाल हंगाम २०२४-२५ साठी जिल्हयात सर्वच ठिकाणी आधारभूत किंमत दराने सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करणे आवश्यक झाले आहे, खरेदी केंद्र सुरू करतानाच त्याचे खरेदीचे अधिकार मार्केट कमिटिला देण्यासाठी सरकारने तात्काळ पावले उचलून तमाम शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी आ. पंकजाताई मुंडे यांनी केली आहे.

# सकारात्मक विचार प्रवाही ठेवतात

## डॉ.वासुदेव मुळाटे : रोटरी राष्ट्र शिल्पकार पुरस्कार सोहळा

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सकारात्मक विचार हेच शिक्षणाचे प्रवाही रूप टिकविणार , शिक्षकाची जागा कुणीच घेवु शकत नाही , अलिकडे सामाजिक चळवळी तुन सत्य बाजुला गेले आहे अशी खंत ही प्रसिद्ध साहित्यिक डॉ. वासुदेव मुळाटे यांनी व्यक्त केले. दिनांक २२ सप्टेंबर २०२४ रोजी सर्वपल्ली राधाकृणानं यांच्या जयंती निमित्त रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटी च्या वतीने रोटरी राष्ट्र शिल्पकार पुरस्कार सोहळा २०२४ वैष्णवी मंगल कार्यालय येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला

कार्यक्रमाचे अध्यक्ष रोटरी क्लब चे विद्यमान अध्यक्ष तथा श्री मंगलनाथ मल्टीस्टेट चे व्यवस्थापकीय संचालक ड.रवींद्र कानडे व कार्यक्रमाच्या प्रमुख उपस्थिती मध्ये रोटरी क्लब डिस्ट्रिक्ट सहा.प्रांतपाल श्री विवेक गंगणे हे होते. लता जोशी , स्मिता कानडे , सुरेखा गवळी , प्रभाकर साळेगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षीय मनोगतात रविंद् कानडे म्हणाले शिक्षक वर्ग हा राष्ट्राचा कना असतो व समाजाला योग्य दिशा देण्याचे कार्य करतो व तो समाजातील महत्वपूर्ण घटक आहे त्यामुळे आदर्श शिक्षक यांचा यथोचित सन्मान होणे आवश्यक असून रोटरी क्लब माजलगावच्या वतीने दरवर्षी नियमित सदरील पुरस्कार सोहळ्याचे आयोजन केले जाते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभाकर साळेगावकर यांनी काम पाहिले तर सूत्र संचालन ड.दीपक देशमुख व डॉ.सुशीलभय्या लोढा यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन रोटरी क्लब च्या विद्यमान सचिव सौ. लता जोशी यांनी केले. तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रोटरी क्लब च्या सर्व सदस्यांनी आपले महत्त्वपूर्ण योगदान दिले.सदरील कार्यक्रमाकरिता माजलगाव परिसरातील , सामाजिक,राजकीय,शिक्षक वर्ग,व्यापारी वर्ग, पत्रकार बांधव व परिसरातील शेकडोच्या संख्येने नागरिक उपस्थित होते.



### या शिक्षकांचा झाला सन्मान

भारत राऊत, बालाप्रसाद चव्हाण, सोमेश्वर मोरे, नंदकुमार शिंदे,नागनाथ पडलवार, राधाकिसन चव्हाण, गणेश राठोड, चंद्रमणी डोंगरे, जयश्री देशमुख, पंचशीला फुलोरे, भाग्यश्री पत्की यांचा यथोचित सन्मान करण्यात आला आहे.

# ओबीसी आरक्षणाची भूमिका स्पष्ट करा !

## श्रीराम तांदळे:ओबीसी गावात मत मागायला येऊ नका

केज /पुण्यभूमी प्रतिनिधी



केज विधानसभा मतदारसंघाच्या विद्यमान आमदार नमिता मुंदडा यांनी गेल्या एक वर्षात ओबीसी आरक्षणाचा विषय चालु आहे या विषयावर आमदार नमिता मुंदडा यांनी साधी प्रतिक्रिया ही दिली नाही किंवा पाठिंब्याचे पत्र सुद्धा दिला नाही त्यामुळे केज मतदार संघातील ओबीसी समाज सध्या आमदारा नमीता मुंदडा यांच्या वर खूप नाराज आहे सध्या ओबीसी आरक्षण बचाव करण्यासाठी लक्ष्मण हाके व वाघमारे आबा उपोषण करीत आहे आमदार नमिता मुंदडा यांनी यावर आज परंतु आमदार म्हणून कुठलीही भूमिका स्पष्ट केलेली नाही जर तुम्ही ओबीसी आरक्षणा विषयाची भूमिका जर स्पष्ट करणार नसाल तर येणाऱ्या विधानसभेमध्ये तुम्हाला ओबीसी समाजाचे एकही मत मिळणार नाही अशी भावना ओबीसी समाज करत आहे

मतदार संघाचे प्रतिनिधित्व करत असताना आ.नमिता मुंदडा तुम्ही एका समाजा पाठींबा देता व एका समाजावर अन्याय करायचा केज मतदार संघात एवढा ओबीसी समाज आहे कि फक्त ओबीसी समाजाच्या मता वर आमदार सुध्दा निवडुन येऊ शकतो तरी पण आमदार म्हणून जर तुम्ही ओबीसी आरक्षणावरची भुमिका स्पष्ट करीत नसाल तर येणाऱ्या विधानसभेला ओबीसी समाजाने तुम्हाला मतदात का करावे आरक्षणाचा मुद्दा पेटलेला असताना एकदा तरी सभागृहात नमिता मुंदडा यांनी ओबीसी आरक्षणा विषयाची प्रश्न मांडला नाही तर मग येणाऱ्या विधानसभेला ओबीसी बांधवांनी जाती साठी मतदान करु नये व आमदारा नमिता मुंदडा यांनी सुध्दा येणाऱ्या विधानसभेत ओबीसी समाज बांधवांच्या दाराला मते मागण्यासाठी येऊ नये असे मत श्रीराम तांदळे यांनी व्यक्त केले आहे.




# परळीमध्ये आढावा बैठक

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

२३३ परळी विधानसभा मतदारसंघ नियोजन आढावा बैठक दि २३ सप्टेंबर रोजी तहसील कार्यालय परळी वै येथे पार पडली. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर यांचे अध्यक्षतेखाली व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा परळीचे तहसीलदार व्यंकटेश मुंडे ,गविअ नागरगोजे , नायब तहसीलदार बाबुराव रुपनर आणि अण्णासाहेब वंजारे, तलाठी गित्ते व सर्व कार्यालय प्रमुख यांचे उपस्थितीत पार पडली.

## अभिवादन — कर्मवीर भाऊराव पाटील जयंती सोहळा

# कर्मवीरांच्या विचारांवर अविरत वाटचाल

राहुरी/ पुण्यभूमी प्रतिनिधी समाजातील गोरगरीब कष्टकरी समाजातील मुलांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध होऊन त्यांचे भविष्य उज्वल व्हावे यासाठी रयत शिक्षण संस्थेची स्थापना करून शिक्षणाची गंगा गरिबांच्या झोपडीत घेऊन जाणाऱ्या पद्मभूषण डॉ कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारावर काळे कुटुंबीयांची तिसऱ्या पिढीची वाटचाल सुरू आहे त्या काळे परिवारांची सून असल्याचा नेहमीच अभिमान वाटतो असे प्रतिपादन जिल्हा बँकेच्या माजी संचलिकाडे चैतालीताई काळे यांनी केले



कोपरगाव तालुक्यातील पोहेगाव येथे रयत शिक्षण संस्थेच्या ग.र औताडे पा माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयात पद्मभूषण डॉ कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त आयोजित वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा सो चैतालीताई काळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला

याप्रसंगी त्या बोलत होत्या यावेळी त्यापुढे बोलताना म्हणाल्या की कर्मवीर भाऊराव पाटील प्रेरणादायी व ऋषीतुल्य व्यक्तिमत्व होते त्यांच्या निस्वार्थी व पवित्र शिक्षण प्रसाराच्या कार्याची कर्मवीर शंकरराव काळे यांनी प्रेरणा घेऊन रयत शिक्षण संस्थेचा विस्तार वाढवीत महत्त्वाची भूमिका बजावून रयत शिक्षण संस्थेच्या शाळा महाविद्यालयाचे निर्मिती करून सर्व प्रकारची मदत केली

तोच वारसा माजी आमदार अशोकराव काळे यांनी आवरितपणे पुढे चालविला व तोच वारसा आमदार आशुतोष काळे हे पुढे अविरतपणे चालवीत आहेत या काळे परिवाराची सून असल्याचा मला स्वार्थ अभिमान आहे त्यांच्या हस्ते विविध स्पर्धमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले यावेळी प्रसिद्ध व्याख्याते राहुल गिरी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# मंत्री रामदास आठवलेंचा सत्कार!

## दिपक कांबळे:केज तालुका हजारोच्या संख्येने सामील होणार

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची केंद्रीय मंत्री मंडळात तिसऱ्यांदा निवड झाल्याबद्दल बीड जिल्हा रिपाइंच्या वतीने युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली शनिवार (दि.५) ऑक्टोबर रोजी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचा ऐतिहासिक भव्य सत्कार सोहळा बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे आयोजित करण्यात आला आहे.



केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी दलित पँथरपासून केज तालुक्यातील गायरान धारकांना, कार्यकर्त्यांना ताकद देण्याचे काम केलेले आहे. दलित पँथरपासून केज तालुका रामदास आठवले यांचा बालेकिल्ला आहे. केज तालुक्यातील रिपाइं पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी अनेक आंदोलने, मोर्चे, गायरान परिषदा ताकदीनिशी यशस्वीपणे पार पाडण्याचे काम केले आहे.केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचा बीड शहरात होणारा भव्य सत्कार सोहळा ऐतिहासिक करण्यासाठी केज तालुका रिपाइंच्या वतीने तालुकाभर सत्कार सोहळ्याची जय्यत तयारी केली आहे.


रामदास आठवले यांचा सत्कार सोहळा ऐतिहासिक करण्यासाठी केज तालुक्यातील रिपाइं पदाधिकारी, गायरान धारक, महिला संपर्क प्रमुख, युवक आघाडी, पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी हजारोच्या संख्येने सामील होऊन शक्ती प्रदर्शन करावे. असे आवाहन रिपाइंचे केज तालुका अध्यक्ष दीपक कांबळे, उत्तम मस्के, गोवर्धन वाघमारे, रवींद्र जोगदंड, दिलीप बनसोडे, गौतम बचुटे,राहुल सरवदे,रमेश निशिगंध, आश्रुबा तुपारे, निलेश ढोबळे,विकास आरकडे, प्रशांत हजारे,नाना गायकवाड, सुरज काळे,मिलिंद भालेराव, रूपचंद ढालमारे, भगवान कांबळे,भारत गायकवाड, नितीन घोडके, राहुल बचुटे आदींनी केले आहे.

# हा वाद एका मंदिरापूरता मर्यादित नाही

### माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी केली चिंता व्यक्त

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी दिल्लीः** आंध्र प्रदेशातील तिरुपती बालाजी मंदिराच्या प्रसादात गोमांस चरबी आणि माशाच्या तेलाचा वापर केल्याचा प्रकार उघडकीस आल्यानंतर राजकीय वाद निर्माण झाला आहे. प्रसादावरून वातावरण तापल्यानंतर प्रसाद चाचणीसाठी पाठवण्यात आला होता. त्याचा अहवाल नुकताच समोर आला. प्रयोगशाळेच्या अहवालाने पुष्टी केली आहे की मंदिराच्या प्रसादामध्ये (लाडू) बीफ फॅट आणि फिश ऑइलचा वापर करण्यात आला होता. प्रसाद राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळाकडे चाचणीसाठी पाठवण्यात आला होता. अश्यातच, आता भारताचे माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी प्रसादात भेसळ केल्याच्या प्रकारावर चिंता व्यक्त केली आहे.



# डॉ. आंबेडकर महाविद्यालयाला नॅकची बी प्लस श्रेणी

देशोन्नती वृत्तसंकलन

**पुणे :** पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या येरवडा येथील डॉ. आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयाला राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रमाणन परिषदेने (नॅक) शैक्षणिक मूल्यांकनात बी प्लस श्रेणी प्रदान केली आहे. यामुळे महाविद्यालयाच्या नावलौकीकात आणखीच विशेष महत्वाची भर पडली आहे. नॅक मूल्यांकन समितीने ९ व १० सप्टेंबरला महाविद्यालयाला भेट देवुन पाहणी व तपासणी केली होती. त्यात शैक्षणिक प्रक्रियेत संस्थेची कामगिरी, अभ्यासक्रमाची निवड आणि अंमलबजावणी, शैक्षणिक दर्जा आणि मूल्यमापन, विद्यार्थ्यांचे निकाल, संशोधन कार्य आणि प्रकाशन, मूलभूत सुविधा आणि संसाधनांची स्थिती, संस्था, प्रशासन, आर्थिक स्थिती आणि विद्यार्थी सेवा आदींचा समावेश होता.




# श्रद्धा वालकर हत्याकांडची बंगळुरूमध्ये पुनरावृत्ती

### फ्रीजमध्ये आढळले महिलेच्या शरीराचे २० तुकडे

देशोन्नती वृत्तसंकलन

**बंगळुरू :** दिल्लीत घडलेल्या श्रद्धा वालकर हत्याकांडाची बंगळुरूमध्ये पुनरावृत्ती घडल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. एका महिलेची निर्घृण हत्या करून तिच्या मृतदेहाचे २० तुकडे फ्रिजमध्ये ठेवण्यात आले होते. बंगळुरूच्या व्यालिकवल परिसरात शनिवारी (दि. २१ सप्टेंबर) ही घटना उघडकीस आली. महालक्ष्मी दास असे हत्या करण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २९ वर्षीय महालक्ष्मी नावाची तरुणीचा खून झाला आहे. तिच्या पतीचे नाव हेमंत दास आहे. पण गेल्या काही दिवसांपासून ती एकटीच राहत होती. सदर खून १५ दिवसांपूर्वीच झाला असून महालक्ष्मीच्या शरीराचे तुकडे करून १६५ लीटरच्या फ्रिजमध्ये ठेवण्यात आले. शेजाऱ्यांना दुर्गंधी येऊ लागल्यानंतर त्यांनी याची माहिती महालक्ष्मीच्या नातेवाईकांना दिली.




**क्वाडः** चीन आपल्या सर्वांची परीक्षा घेत आहे, अशा शब्दांमध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी चिंता व्यक्त केली. क्वाडच्या बेठकीत त्यांनी व्यक्त केलेली चिंता नेत्यांनी हॉट माइकवर ऐकली. यावरुन अमेरिका चीनच्या वाढत्या वर्चस्ववादाबाबत किती गंभीर आहे हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले.

# संदीप घोषच्या निकटवर्तीयाची सीबीआय चौकशी

### डॉ. बिरुपपाक्ष बिस्वास यांची चौकशी

देशोन्नती वृत्तसंकलन



**कोलकाता :** प्रशिक्षणार्थी डॉक्टरवरील बलात्कार व हत्या अटक करण्यात आलेला आरजी कार वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचा प्राचार्य संदीप घोषच्या निकटवर्तीय डॉक्टरची शनिवारी सीबीआयने चौकशी केली, अशी माहिती तपास यंत्रणेच्या अधिकाऱ्याने दिली. बिरुपपाक्ष बिस्वास असे चौकशी केलेल्या डॉक्टरचे नाव आहे. पश्चिम बंगालच्या आरोग्य विभगाने अलिकडेच त्याची वर्धमान वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथून २४ परगणा जिल्ह्याच्या दुर्गम भागातील रुग्णालयात बदली केली.

# आता कर्नाटक राज्य तपासणार प्रसाद

देशोन्नती वृत्तसंकलन

**बंगळूर :** आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी तिरुपतीच्या तिरुमला मंदिरात दिल्या जाणाऱ्या लाडूच्या प्रसादात प्राण्यांची चरबी वापरली जात असल्याच्या वक्तव्यानंतर मोठा वाद निर्माण झाला आहे. आता कर्नाटकातील सर्व प्रमुख मंदिरांमध्ये भाविकांना दिला जाणारा प्रसाद चाचणीनंतर भक्तांना वाटला जाईल, असे धर्मादाय विभागाचे मंत्री रामलिंगा रेड्डी यांनी सांगितले.

### सरकारच्या देखरेखीखाली ३४ हजार मंदिरे

कर्नाटकात एंडोमेंट विभागाच्या देखरेखीखाली ३४ हजार मंदिरे आहेत. त्यापैकी अ वर्ग २०५ मंदिरांचे वार्षिक उत्पन्न २५ लाखांपेक्षा जास्त आहे. ब वर्ग १९३ मंदिरांचे वार्षिक उत्पन्न ५ लाख ते २५ लाख रुपये आहे. उर्वरित पाच लाखांपेक्षा कमी उत्पन्न असलेली मंदिरे क वर्ग म्हणून वर्गीकृत आहेत.



## अत्यावश्यक आणि आपत्कालीन विभागांतच सेवा देण्याचा निर्णय

# कोलकतामध्ये डॉक्टर अंशत: सेवेत

देशोन्नती वृत्तसंकलन

**कोलकाता :** तब्बल ४२ दिवसांच्याखंडानंतर शनिवारी पश्चिम बंगालमधील विविध सरकारी रुग्णालयांमध्ये आंदोलक डॉक्टर अंशतः कर्तव्यावर रुजू झाले. त्यातही बाह्यरुग्ण विभागांऐवजी (ओपीडी) केवळ अत्यावश्यक आणि आपत्कालीन विभागांतच सेवा देण्याचा निर्णय या डॉक्टरांनी घेतला आहे. कोलकाता येथील आर. जी. कर वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात कर्तव्यावर असलेल्या महिला प्रशिक्षणार्थी डॉक्टरच्या बलात्कार आणि हत्येच्या निषेधार्थ या डॉक्टरांनी काम बंद आंदोलन पुकारले होते. आम्ही कर्तव्यावर पुन्हा रुजू होण्यास सुरुवात केली. आमचे सहकारी आज सकाळपासून आपापल्या विभागांमध्ये फक्त अत्यावश्यक आणि आपत्कालीन सेवांमध्ये परतू लागले आहेत. यात ओपीडींचा समावेश नाही. हे विसरू नका की, आम्ही अंशतःच कर्तव्यावर रुजू झालेलो आहेत, असे आंदोलन करणाऱ्या डॉ. अनिकेत महतो यांनी पीटीआयला सांगितले.

### आपत्कालीन सेवा पूर्वपदावर

पश्चिम बंगालमधील विविध सरकारी रुग्णालयांमध्ये डॉक्टर पुन्हा कामावर रुजू झाल्याने आपत्कालीन सेवा पूर्वपदावर आल्याचे चित्र आहे. आमच्यासाठी हा मोठा दिलासा आहे. आमचे त्यांच्या मागण्यांना समर्थन जरूर आहे. परंतु काम बंद झाल्यामुळे आमच्यासारख्या नियमित रुग्णांना उपचार मिळणे खूप कठीण झाले होते, असे बांकुरा येथील वैद्याकीय महाविद्यालय आणि रुग्णालयातील रुग्ण दीपंकर जाना म्हणाले.

दरम्यान, डॉक्टर पुन्हा सेवेत रुजू झाल्याने पूर्बा मेदिनीपूर जिल्ह्यातील पूरग्रस्त पंसकुरा येथील अभय क्लिनिकमध्ये अनेक रुग्ण दाखल होऊ लागले. आम्हाला या दवाखान्यांमध्ये खूप चांगला प्रतिसाद मिळत आहे. अनेकांनी या दवाखान्यांना भेटी दिल्या आणि आमच्या सहकाऱ्यांनी त्यांच्यावर उपचार केले. आम्ही या रुग्णांना २४ तास सेवा देण्यासाठी तयार आहोत, ही आमची बांधिलकी आहे,' असे कनिष्ठ डॉक्टर अहेली चौधरी यांनी सांगितले.

# सोने, हिऱ्यांच्या तस्करीत तिघांना अटक !

### सीमाशुल्क विभागाने 3.12 कोटींचा माल केला जप्त

देशोन्नती वृत्तसंकलन

**मुंबई :** मुंबईत सीमाशुल्क विभागाने मोठी कारवाई केली आहे. सीमाशुल्क विभागाने शुक्रवारी २०-२१ सप्टेंबरच्या रात्री दोन वेगवेगळ्या प्रकरणात एकूण २.२८६ किलो सोने आणि हिरे जप्त केले. या हिऱ्यांची आणि सोन्याची अंदाजे किंमत १.५८ कोटी रुपये (सोन्याची किंमत) आणि १.५४ कोटी रुपये (हिर्यांची किंमत) आहे. हा माल प्रवाशांच्या अंगावर बनवलेल्या विशेष ठिकाणी, वेस्टमधील गुप्त ठिकाणी आणि पँटच्या पट्ट्याजवळ लपवून ठेवण्यात आला होता. याप्रकरणी तीन प्रवाशांना अटक करण्यात आली आहे.



पहिल्या प्रकरणात, विमानतळावरील कस्टम्सने दुबईहून मुंबईत येणाऱ्या एका प्रवाशाला थांबवले आणि त्याच्याकडून तस्करीचा माल जप्त केला, ज्यात २४ कॅरेट सोन्याचे (एकूण वजन १४०० ग्रॅम) १२ बार होते, ज्याची अंदाजे किंमत ९७,००,२३६ रुपये आहे. हे सोने प्रवाशाने परिधान केलेल्या पॅन्टच्या बेल्टजवळ लपवले होते. चौकशीदरम्यान प्रवाशाने सांगितले की, हे कृत्य त्याच फ्लाइटमधून प्रवास करणाऱ्या दुसऱ्या प्रवाशाच्या सांगण्यावरून केले आहे. सहप्रवाशानेही आपल्या निवेदनात हे मान्य केले. दोन्ही प्रवाशांना अटक करण्यात आली. दुसऱ्या प्रकरणात, हाँगकाँगहून मुंबईला येणाऱ्या एका प्रवाशाला विमानतळावर थांबवून त्याच्याकडून तस्करीचा माल जप्त करण्यात आला, ज्यामध्ये दोन २४ कॅरेट सोन्याच्या बांगड्या (एकूण वजन ८८६ ग्रॅम, किंमत ६१,३८,८६४ रुपये), रोलेक्स घड्याळ १३,७०,५२० मूल्य) आणि नैसर्गिक हिरे (किंमत १,५४,१८,५७५ रुपये).

# श्रीलंकेत राष्ट्रपती निवडणुकीनंतर संचारबंदी लागू

देशोन्नती वृत्तसंकलन

**कोलंबो :** राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीनंतर श्रीलंकेत अचानक कर्फ्यू लागू करण्यात आला आहे. यामुळे संपूर्ण देशात खळबळ उडाली आहे. कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून आज रात्री १० ते रविवारी सकाळी ६ वाजेपर्यंत कर्फ्यू लागू करण्यात आला आहे, असे श्रीलंकेच्या पोलिसांनी सांगितले. विद्यमान अध्यक्ष रानिल विक्रमसिंघे यांनी राजपत्र जारी करून कर्फ्यू आदेश लागू केला आहे. मतमोजणी सुरू असताना संचारबंदी जाहीर करण्यात आली. मात्र, अद्याप निकाल जाहीर झालेला नाही. मात्र या काळात परिस्थिती आणखी बिघडण्याची शक्यता आहे.

श्रीलंकेतील निवडणुकीचे निकाल रविवारपर्यंत जाहीर होण्याची शक्यता आहे. राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीवर लक्ष ठेवण्यासाठी विविध आंतरराष्ट्रीय निवडणूक देखरेख संस्थांचे ११६ प्रतिनिधी श्रीलंकेत पोहोचले आहेत. ७८ निरीक्षक युरोपियन युनियन म्हणजेच EU मधील आहेत. ईयूने यापूर्वी सहा वेळा श्रीलंकेत निवडणुकीचे निरीक्षण केले आहे. श्रीलंकेचे विद्यमान राष्ट्राध्यक्ष रानिल विक्रमसिंघे हे देशाला आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी केलेल्या प्रयत्नांच्या यशाच्या जोरावर अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवत आहेत. तिरंगी निवडणूक लढतीत ७५ वर्षीय विक्रमसिंघे यांना नॅशनल पीपल्स पॉवर (NPP) च्या ५६ वर्षीय अनुरा कुमारा दिसानायके आणि ५७ वर्षीय समगी जना बालावेगया (SJB) नेते सजीथ प्रेमदासा यांचे मोठे आव्हान आहे.



## सुप्रीम कोर्टाची यूट्यूब चॅनेल सेवा पूर्ववत्

**नवी दिल्ली :** शुक्रवारी हॅक झालेल्या सर्वोच्च न्यायालयाच्या यूट्यूब चॅनेलवरील सेवा पुन्हा सुरू झाल्या आहेत. सर्व संबंधितांना कळविण्यात येत आहे की, भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे यूट्यूब चॅनेल थेट सुरू आहे. यूट्यूब चॅनेलवरील सेवा पुन्हा सुरू करण्यात आल्या आहेत, असे न्यायालयाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाचे यूट्यूब चॅनेल शुक्रवारी हॅक करण्यात आले होते आणि त्यावर यूएस-आधारित कंपनी रिपल लॅब्सने विकसित केलेल्या क्रिप्टोकरन्सीचा प्रचार करणारे व्हिडीओ दाखवले जात होते. एका रिक्त व्हिडीओचे थेट प्रक्षेपण हॅक केलेल्या चॅनेलवर सुरू होते. नंतर, सर्वोच्च न्यायालयाच्या वेबसाईटवर पोस्ट केलेल्या निवेदनामध्ये न्यायालयाचे यूट्यूब चॅनेल आल्याची माहिती देण्यात आली.

# युक्रेनच्या ड्रोन हल्ल्यात रशियातल्या शस्त्र गोदामाला आग

देशोन्नती वृत्तसंकलन

**क्रिमियाः** युक्रेनने केलेल्या ड्रोन हल्ल्यात रशियाच्या वायव्येकडील भागातल्या आणखी एका शस्त्र गोदामाला भीषण आग लागली आहे. या आगीमुळे या गोदामामध्ये भीषण स्फोट झाले असून एक महत्वाचा महामार्ग वाहतुकीसाठी बंद करावा लागला आहे. युक्रेनने रात्रभरात सुमारे १०० ड्रोनचा मारा रशियाच्या वायव्येकडील भागात आणि रशियाने ताबा घेतलेल्या क्रिमियामध्ये केला आहे, असे रशियातल्या सरकारी वृत्तसंस्थेने आणि संरक्षण मंत्रालयाने म्हटले आहे. युक्रेनच्या ड्रोन हल्ल्यात बुधवारी याच भागातल्या आणखी एका शस्त्र गोदामालाही अशीच आग लागली होती.



त्यावेळी १३ जण जखमी झाले होते. आज झालेल्या ड्रोन हल्ल्यानंतर रशियाने सुमारे १०० किमोमीटरचा महामार्ग वाहतुकीसाठी बंद केला आणि मोठमोठे स्फोट व्हायला लागल्यामुळे जवळच्या रेल्वे स्टेशनमधील प्रवाशांना तात्काळ तेथून बाहेर काढण्यात आले. हा ड्रोन हल्ला मॉस्कोच्या वायव्येकडे ३६० किमोमीटर अंतरावरच्या तवेर भागातल्या तोरोपेत्स शहराजवळ झाला.

# आमदार मुनिरत्न यांना पुन्हा अटक; अत्याचार प्रकरणात पोलिसांची कारवाई

देशोन्नती वृत्तसंकलन

**बेंगळूर :** जात अवमानना प्रकरणात जामीन मिळालेल्या बेंगळूरमधील राजराजेश्वरीनगरचे आमदार मुनिरत्न नायडू यांना अत्याचार प्रकरणात पुन्हा अटक करण्यात आली आहे. रामनगर जिल्ह्यातील कग्गलिपूर पोलिसांनी मुनिरत्न यांना अटक केली आहे. जात अवमानना प्रकरणात गुरुवारी लोकप्रतिनिधींच्या विशेष न्यायालयाने मुनिरत्न यांना जामीन मंजूर केला होता.



शुक्रवारी बेंगळूरच्या परप्पन अग्रहार कारागृहातून जामीनावर मुक्तता होताच अत्याचार प्रकरणात मुनिरत्न यांना ताब्यात घेऊन कग्गलिपूर पोलीस स्थानकात नेण्यात आले.

# संततधार पावसाने जपानला झोडपले ; एकाचा मृत्यू

देशोन्नती वृत्तसंकलन

**टोक्यो :** जपानच्या उत्तरमध्य नोटो प्रांताला आज जोरदार पावसाने झोडपले. या पावसामुळे या प्रांतात भूस्खलन आणि पुरस्थिती निर्माण झाली आहे. पुराचे पाणी अनेक घरांमध्ये शिरले असून याच प्रांतात या वर्षाच्या सुरुवातीला भूकंपाचा जोरदार धक्का बसला होता. त्या आपत्तीतून सावरत असतानाच अतिवृष्टीचे संकट उभे राहिले आहे. या पावसामुळे उत्तर जपानमधील इशिकावा भागात एकाचा मृत्यू झाला असून सात जण बेपत्ता आहेत.

### इशिकावा भागात सात जण बेपत्ता

सुझू, वाजिमा आणि नोटो नगरपालिकेतील नद्यांमध्ये मृत व्यक्ती वाहून गेल्याची माहिती स्थानिक अधिकाऱ्यांनी दिली. शिवाय, हवामानाचा अंदाज वर्तविणाऱ्यांनी या प्रदेशात मोठ्या पुराचा इशारा दिल्यानंतर जवळपास ४० हजार लोकांना स्थलांतरित होण्याचे आदेश देण्यात आले आहेत. वाजिमा शहरातील सुमारे १८ हजार लोकांना आणि सुझूमधील आणखी १२ हजार लोकांना होन्शु बेटावरील इशिकावाच्या सुरक्षित झोनमध्ये आश्रय घेण्यास सांगण्यात आले आहे. तत्पूर्वी, जपान हवामान संस्थेने इशिकावा प्रदेशात मुसळधार पावसासाठी जीवघेणा इशारा जारी केला होता. हा इशारा उद्या दुपारपर्यंत राहण्याची अपेक्षा आहे. या भागातील १२ नद्यांचे पात्र ओसंडून वाहू लागले आहे.



## पोखरण फायरिंग रेंजमध्ये सरावावेळी मोर्टार स्फोट

**जैसलमेर :** राजस्थानमधील जैसलमेर येथील पोखरण फील्ड फायरिंग रेंज येथे शुक्रवारी दुपारी १२.३५ च्या सुमारास युद्धसराव सुरू असताना अचानक मोर्टार बॉम्बचा स्फोट झाला. या दुर्घटनेत सीमा सुरक्षा दलाचे (बीएसएफ) चार जवान जखमी झाले. स्फोटानंतर घटनास्थळी एकच गोंधळ उडाला. सर्व जखमींना पोखरण ऊग्णालयात दाखल करण्यात आले.

# बर्फ बनविणाऱ्या कारखान्यात गॅसगळती!

### गॅसगळतीत एकाचा मृत्यू

देशोन्नती वृत्तसंकलन

**जालंधर :** पंजाबच्या जालंधरमधील एमबीडी बुक्सच्या इमारतीजवळ बनलेल्या, बर्फाच्या कारखान्यात गॅसगळती होऊन एकाचा मृत्यू झाला आहे. मात्र, तीन लोकांना वाचविण्यात यश आले आहे. जवळपास २ तास हे रेस्क्यू ऑपरेशन राबविण्यात आले असून मृतदेह बाहेर काढण्यात आला आहे. खबरदारीचा उपाय म्हणून हा संपूर्ण परिसर सीलबंद करण्यात आला आहे. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठविण्यात आला आहे. बर्फाच्या या कारखान्यात अमोनिया वायूची गळती झाल्याने लोकांना श्वास घ्यायला त्रास होत असल्याच्या घटना उघडकीस आल्या.



**विल्मिंग्टनः** क्वाड शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी आणि संयुक्त राष्ट्रांच्या एका महत्त्वाच्या परिषदेला संबोधित करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी शनिवारी तीन दिवसांच्या अमेरिकेच्या दौऱ्यावर पोहोचले. विल्मिंग्टनच्या पुढील भेटीसाठी मोदी फिलाडेल्फियाला पोहोचले आहेत. येथे त्यांचे मूळ भारतीय नागरिकांनी जोरदार स्वागत केले.

# जास्त काम करण्याच्या बाबतीत भारत जगात दुसरा

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी दिल्ली :** भारतातील काम करण्याच्या परिस्थितीत सुधारणा होत असल्याचे दिसत नाही. येथे लोकांना विहित मुदतीपेक्षा जास्त काम करायला लावणे ही कंपन्यांची सवय झाली आहे. जास्त काम करण्याच्या बाबतीत भारतीय कंपन्या जगात दुसऱ्या क्रमांकावर आल्या आहेत. इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशनच्या आयएलओच्या अहवालात हा दावा करण्यात आला आहे.

आयएलओच्या अहवालानुसार, प्रत्येक भारतीय कर्मचारी आठवड्यातून सरासरी ४६.७ तास काम करतो. भूतानशिवाय आपल्या शेजारी देशांतील कर्मचाऱ्यांची अवस्थाही वाईट आहे. बांगलादेशात ४७ टक्के लोक आणि पाकिस्तानात ४० टक्के लोक आठवड्यात ४९ तासांपेक्षा जास्त काम करतात. या दोन्ही देशांचा टॉप १० यादीत समावेश करण्यात आला आहे.

### अहवालानुसार, जगातील कामाची सरासरी

यूएईमध्ये हा आकडा ५०.९ तास आहे आणि लेसोथोमध्ये ५०.४ तास आहे. तथापि, यूएईच्या केवळ ३९ टक्के लोकसंख्येला आणि लेसोथोच्या ३६ टक्के लोकांना आठवड्यातून इतके तास काम करावे लागते. नेदरलँड आणि नॉर्वेसारख्या देशांमध्ये कर्मचाऱ्यांची विशेष काळजी घेतली जाते. या देशांमध्ये वर्क लाइफ बॅलन्सला खूप महत्त्व दिले जाते.

त्यात पुढे असेही म्हटले आहे

### आयएलओच्या अहवालात माहिती



की, भारतातील ५१ टक्क्यांहून अधिक कामगार आठवड्यातून ४९ तासांपेक्षा जास्त काम करतात.

## इम्रान खान यांच्या पक्षाचे पुन्हा शक्तिप्रदर्शन

**लाहोर :** इम्रान खान यांच्या पीटीआय पक्षाने शक्तिप्रदर्शन करण्यासाठी आज लाहोरमध्ये पुन्हा मोठी सभा घेतली. मात्र सभेची वेळ उलटून गेल्याचे सांगून पोलिसांनी या सभेची वीज आणि माईक सिस्टीम बंद केली. पाकिस्तान तेहरिक-ए-इन्साफ पक्षाने आगोदर ही सभा मिनार-ए-पाकिस्तानमध्ये आयोजित केली होती. मात्र मरियम नवाज यांच्या सरकारकडून तेथे सभेची परवानगी न मिळाल्यामुळे शहराबाहेरच्या जनावरांच्या बाजारात घेण्यात आली.

# कृषी मंत्र्यांच्या परळीत आक्रोश मोर्चा!

## आक्रमक शेतकरी संघर्ष समिती मोर्चा ठरला लक्षवेधी

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

शेतकऱ्यांचा पिक विमा, अनुदान, कर्जमाफी व केंद्र व राज्य सरकारने केलेल्या घोषणांची अंमलबजावणी करावी यासह इतर मागण्यांसाठी शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने सोमवारी (ता.२३) परळी उपविभागीय कार्यालयावर बैलगाडी व ट्रॅक्टर चा भव्य मोर्चा काढण्यात आला. पहिल्यांदाच बैलगाडी व ट्रॅक्टर मोठ्या संख्येने रॅलीत सहभागी होत राज्याच्या कृषिमंत्र्याच्या मतदार संघातच बळीराजाने सरकार विरोधात एल्गार पुकारला.





यावेळी शेतकरी संघर्ष समितीचा घटक असलेल्या अखिल भारतीय किसान सभेचे जिल्हाध्यक्ष कॉ.एड.अजय बुरांडे यांनी अभ्यासपूर्ण मांडणी करत शेतकऱ्यांची पूर्ण कर्जमाफी, शेतात पिकलेला आणि पडलेल्या भावामुळे घरात दोन वर्षांपासून असलेला सोयाबीन हे सरकार हमीभावाने खरचं सर्व सोयाबीन खरेदी करणार काय? इतर आश्वासनाप्रमाणे ही पण केवळ पोकळ घोषणाच ठरणार असा सवाल सरकारला केला, तर माजी जिल्हा परिषद सदस्य प्रभाकर वाघमोडे यांनी संबोधित करताना सांगितले की,बीड जिल्ह्यातील जनतेने भरभरून प्रेम दिलेल्या आणि विरोधी पक्षात असताना शेतकऱ्यांबद्दल पोटतिडकीने बोलणारा व्यक्ती आज सुदैवाने कृषी मंत्री असून कृषीमंत्र्यांनी बळीराला न्याय देऊन त्याच्या प्रेमातून उतराई होण्याची संधी गमावू नये असे सांगितले.तर केवळ आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवत शेतकरी हिताच्या घोषणा नकोय तर प्रत्यक्ष अंमलबजावणी करा अशी मागणी यावेळी शेतकरी नेते कालिदास आपेट तर शेतकऱ्यांना तातडीने मदत करा अशी मागणी अच्युत गंगणे यांनी केली.

बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा प्रलंबित पिक विमा,सोयाबीन खरीप पिक विमा, कापूस-सोयाबीन अनुदान, पासून वंचित आहे. केंद्र व राज्य सरकारच्या वतीने वेगवेगळ्या अनुदानाच्या घोषणा केल्या जातात मात्र शेतकऱ्यांच्या पदरात काहीच पडत नाही. सरकारच्या उदासीन भूमिकेमुळे बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अद्याप पीक विमा मिळालेला नाही.पीक विमा, हमीभाव, कर्जमुक्ती, यासह इतर मागण्याला घेत सोमवारी (ता.२३) शेतकरी संघर्ष समिती च्या वतीने परळी येथील उपविभागीय पान २ वर...

# केजमध्ये थरार,विद्यार्थी अपहरणाचा प्रयत्न!

## भयभित: एकास पकडले दोघे फरार



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज शहरातील मुख्य रस्त्यावर सोनार गल्लीत चार चाकी मधून आलेल्या तिघांनी शाळेत चाललेल्या विद्यार्थ्याचे अपहरण करण्याचा प्रयत्न केला. परंतु काही तरुणांनी हा प्रयत्न हाणून पाडला. अपहरण करणारा एक जण हाती लागला असून दोघे पळून जाण्यात यशस्वी झाले. या थरारक घटनेने शहरात खळबळ उडाली असून बालके चोरणारी टोळी पडल्याची शहरात चर्चा सुरू झाली आहे. पकडलेल्या त्या व्यक्तीला पोलिसांच्या ताब्यात दिले असून नेमका हा प्रकार काय? हे तपासातून समोर येईल. मेन रोडने सकाळी १० च्या सुमारास एक विद्यार्थी सोनार गल्लीतून शाळेला जात होता. त्यावेळी अचानक एक चारचाकी वाहन आले. ते वाहन मुलाजवळ येऊन थांबले काही समजण्याच्या आत त्या विद्यार्थ्याला उचलून वाहनात टाकण्याचा प्रयत्न केला असता घडलेल्या या पान २ वर...

# सासरे बुवाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष?

## सवाल:स्वारातीत रेडिओलॉजी विभागात रुग्णांची हेळसांड




केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज अंबाजोगाई विधानसभा मतदारसंघाच्या विद्यमान आमदार अंबाजोगाई स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय गेल्या काही दिवसापासून विविध प्रश्नांनी गाजत असून याचा फटका सर्वसामान्य रुग्णांना बसत आहे. या प्रश्नासाठी स्थानिक आ. नमिता मुंदडा यांनी लक्ष देणे गरजेचे आहे. स्वाराती रुग्णालय हे सामान्य रुग्णांना परवडणारे आहे मिळालेल्या माहितीनुसार स्वाराती रुग्णालयातील रेडिओलॉजी विभागात एकच सोनोग्राफी मशीन उपलब्ध असल्याने रुग्णांना सोनोग्राफी करण्यासाठी तासंतास ताटकळत उभे राहावे लागते. या प्रश्नाकडे लोकप्रतिनिधी आणि स्वाराती रुग्णालय प्रशासनाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याने रुग्णांचे मात्र अतोनात हाल होत आहे. दुसरीकडे रुग्णांना देखील सोनोग्राफी कक्षामध्ये असणाऱ्या रेडिओलॉजीस्ट कडून अरेरावीची भाषा वापरण्यात येत असल्यामुळे रुग्णांमधून व नातेवाईकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. लोकप्रतिनिधींनी व स्वाराती प्रशासनाने तात्काळ दुसरी सोनोग्राफी मशीन उपलब्ध करून देण्याची मागणी जोर धरू लागली आहे. याबाबत प्राप्त माहिती अशी की स्वाराती रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय आसपासच्या जिल्ह्यासाठी वरदान ठरले आहे. गेल्या काही दिवसापासून हवामानात होत असलेल्या बदलामुळे रुग्णांना विविध आजारांनी ग्रासले असल्याने त्यांचा ओढा या रुग्णालयाकडे मोठ्या प्रमाणात पान २ वर...

# संसदेलाच निर्णय घेण्याचा अधिकार

## अ‍ॅड. प्रकाश आंबेडकर : आरक्षण निकाल मूलभूत संरचनेच्या विरोधात

पुणे/ पुण्यभुमी प्रतिनिधी

आमच्या दृष्टिकोनातून वर्गीकरण करायचे की नाही, क्रिमीलेयर लावायचे की नाही याचा निर्णय कोर्ट घेऊ शकत नाही, तर याचा निर्णय घेण्याचा अधिकार संसदेलाच असल्याचे वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष अ‍ॅड.प्रकाश आंबेडकर यांनी पुणे येथील पत्रकार परिषदेत सांगितले. ते सुप्रीम कोर्टाच्या क्रिमीलेयर आणि आरक्षण वर्गीकरणाच्या संदर्भात बोलत होते.सुप्रीम कोर्टाने क्रिमीलेयर आणि आरक्षण वर्गीकरणासंदर्भातील जो निर्णय दिला होता. त्या संदर्भातील रिव्हिव पीटीशन आम्ही दाखल केले होते. उद्या ते पीटिशन चेंबरमध्ये हिअरिंगला येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.



अ‍ॅड. आंबेडकर म्हणाले की, ब्रिटिशांच्या कालावधीमध्ये आणि त्या आधीच्या कालावधीमध्ये ज्यांना कोणाला आरक्षण देण्यात आले आहे त्या सगळ्यांचा प्रशासनात कुठेही सहभाग नव्हता. स्वातंत्र्यानंतर पान २ वर...

# कर्मचारी पतसंस्था मोठा आधार

## डॉ.योगेश क्षीरसागर:बीडमध्ये सर्वसाधारण सभा

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड येथील नवगण, विनायक कर्मचारी सहकारी पतसंस्थेतचे कार्य उत्कृष्ट असून यामुळे कर्मचाऱ्यांना हक्काचा आधार ठरलेली आहे. यात वाढ करत संस्थेने कर्मचाऱ्यांसाठी विविध उपक्रम राबविण्यास सुरुवात करावी, असे मत संस्थेचे सहसचिव तथा राष्ट्रवादी कॉंग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केले.बीड शहरातील नवगण, विनायक शिक्षण संस्थेची नवगण, विनायक कर्मचारी सहकारी पतसंस्थेची २७ वी सर्वसाधारण सभा रविवारी (दि.२२) सकाळी ११:३० वाजता शहरातील के.एस.के येथील स्पोर्ट्स सभागृहात पार पडली. यावेळी डॉ.योगेश क्षीरसागर हे प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.




सभेच्या अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्षा तथा शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्षा प्रा.दीपा क्षीरसागर या होत्या. यावेळी डॉ.सारिकाताई क्षीरसागर, नवगण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा.किशोर काळे, संचालक आमेर सिद्दीकी, प्रशासक प्रा.सुधाकर गुट्टे, कार्यालयीन अधीक्षक व्ही.टी.देशमाने, पतसंस्थेचे अध्यक्ष बालासाहेब चवार, सचिव राजेंद्र कुंहे, विना भोज, लिंबाजी उजगरे, सुनिल सपाटे, रमेश चौरे, सचिन पवार, श्रीहरी लहाने, रिझवान काझी, रमेश जाडकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी अध्यक्ष बालासाहेब चवार पान २ वर...

# ऐतिहासिक सत्कार सोहळ्यात शक्ती प्रदर्शन

## अविनाश जोगदंड:रिपाइं कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय मंत्री रामदास आठवले दलित पँथर काळापासून आजपर्यंत रिपाइंच्या माध्यमातून समाज बांधवांच्या न्याय, हक्क अधिकारासाठी संघर्ष करीत आहेत. संघर्षशील नेतृत्वाची भारत सरकारच्या केंद्रीय मंत्रिमंडळात केंद्रीय मंत्रीपदी तिसऱ्यांदा निवड झाल्याबद्दल रामदास आठवले यांचा भव्य सत्कार सोहळा बीड जिल्हा रिपाइंच्या वतीने युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा प बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे शनिवार (दि.५) ऑक्टोबर रोजी सायंकाळी ठीक ५ वाजता रिपाइं मान्यवरांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला आहे.



रिपब्लिकन पक्षाच्या वतीने मंत्री रामदास आठवले यांच्या प्रमुख उपस्थितीत युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली अनेक गायरान परिषद, मोर्चे, जेलभरो आंदोलन यांच्यासह विविध आंदोलनात रिपाइं कार्यकर्त्यांनी ताकदीनिशी सामील होऊन आंदोलने यशस्वी करण्याचे काम केले आहे.शनिवार (दि.५) ऑक्टोबर पान २ वर...

# धनगर समाज उतरला रस्त्यावर!

## इशारा: सरकारने तत्परता न दाखवल्यास उग्र आंदोलन

भगवान साकसमुद्रे/परळी

पंढरपूर , लातूर , नेवासा या ठिकाणी उपोषणाला बसलेल्या धनगर जमातीच्या उपोषणकर्त्यांना पाठिंबा म्हणून धनगर आरक्षण अंमलबजावणी एसटी प्रमाणपत्र मिळण्यासाठी आरक्षणाच्या हक्कासाठी धनगर जमातीच्या वतीने परळी-वैद्यनाथ येथील ईटके कॉर्नर येथे तासभर रास्ता रोको आंदोलन केले. सरकारचा जाहीर निषेध नोंदवत घोषणा दिल्या. परळी-वैद्यनाथ येथील ईटके कॉर्नर आंदोलकांनी बीड -परभणी-नांदेड महामार्ग रोखून धरला. या रास्ता रोकोमुळे मोठी वाहतूक कोंडी होऊन वाहनांच्या रांगा लागल्या. यामुळे काही काळ वाहतुक खोळंबली होती. धनगर आरक्षण प्रश्नी सरकारने तत्परता न दाखवल्यास उग्र आंदोलन करण्याचा इशारा धनगर समाजचे युवा नेते शिवदास बिडगर व आदोलकांनी दिला आहे.



आदिवासी समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता धनगर जमातीला एसटी या प्रवर्गातून आरक्षण द्यावे. या प्रमुख मागणीसह पंढरपूर, लातूर व नेवासा येथे सुरू असलेल्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी संपूर्ण राज्यभर धनगर समाजाचे नेते आ. गोपीचंद पडळकर यांच्या आव्हानाला पाठिबा देत रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. तसेच या सरकारने तात्काळ मागणीचे परिपत्रक काढावे या मागणीसाठी अंदोलकांनी जोर धरला. समाजाचा अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गाची अंमलबजावणी करून त्यांना आरक्षण देण्याची मागणी करत रस्त्यावर बसून आंदोलन केले . आम्ही राज्य सरकारकडे नवीन काहीही मागत नाही. आम्हाला फक्त आमचा हक्क हवा आहे जो भारतीय संविधानाने दिलेला आहे आणि पान २ वर...

# डॉ.अंजली घाडगेंचे पारडे जड !

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी



केज मतदारसंघामध्ये २०१९ मध्ये भाजपकडून नमिता मुंदडा यांचा विजय झाला होता. परंतू काही वर्षापासून केज मतदारसंघात अक्षय मुंदडा, नंदकिशोर मुंदडा यांची दादागिरी चांगलीच वाढली आहे. ही दादागिरी मागे काही उघडकीस आलेल्या प्रकरणातून समोर येत आहे. यामुळे मुंदडांची दादागिरी यावेळेस येथील मतदार २०२४ च्या निवडणूकीत उतरविण्याच्या तयारीत आहेत. तर दुसरीकडे तुतारीकडून केज मतदारसंघामध्ये निवडणूकीच्या रिंगणात उतरण्याची तयारी करणारे डॉ. अंजली घाडगेंचे पारडे सध्या तरी जड वाटत आहे. घाडगे परिवाराचे केज मतदारसंघात मोठे योगदान आहे. डॉ. अंजली घाडगे यांना सध्या केज मतदारसंघात वाढता पाठिंबा मिळत आहे. या मतदारसंघात त्यांना मानणारा मोठा वर्ग असल्यामुळे तुतारीकडून अंजली घाडगे जवळपास निश्चित झाले असल्याची माहिती आहे.

## मयुरीताई मस्के-खेडकर तलवाडा फाटा, खंडवी ग्रामस्थांचे आंदोलन

# सरकारने धनगर आरक्षण प्रश्न सोडवावा!

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

धनगर समाजाला एसटी प्रवर्गाचे आरक्षण लागू करावे. पंढरपूर, लातूर , नेवासा या ठिकाणी उपोषणाला बसलेल्या धनगर समाजाच्या उपोषणकर्त्यांची सरकारने तातडीने दखल दखल घ्यावी. या मागणीसाठी गेवराई तालुक्यातील खांडवी, तलवाडा फाटा येथे सोमवार (दि.२३) रोजी रास्तारोको आंदोलन करण्यात आले.या आंदोलनात मयुरीताई बाळासाहेब मस्के-खेडकर यांनी सहभाग घेवून धनगर आरक्षणाचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा अशी मागणी केली.





धनगर आरक्षण अंमलबजावणी करून एसटी प्रमाणपत्र देण्यात यावे,उपोषणकर्त्यांची सरकारने तातडीने दखल दखल घ्यावी यासह आरक्षणाच्या हक्कासाठी धनगर जमातीच्या वतीने राज्यभर रास्तारोको आंदोलन पुकारण्यात आले होते. त्या अनुषंगाने बीड जिल्हाभर धनगर समाज बांधवांनी आंदोलन करुन सरकारवर रोष व्यक्त केला. यावेळीआंदोलनकर्त्यांनी सरकारचा जाहीर निषेध नोंदवत घोषणा दिल्या.आंदोलकांनी रस्ता रोखून धरला. या रास्ता रोकोमुळे मोठी वाहतूक कोंडी होऊन वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. यामुळे काही काळ वाहतुक खोळंबली होती. धनगर आरक्षण प्रश्नी सरकारने तत्परता न दाखवल्यास उग्र आंदोलन करण्याचा इशारा धनगर जमातीच्या वतीने देण्यात आला. यावेळी मयुरींताई बाळासाहेब मस्के-खेडकर म्हणाल्या की, धनगर जमातीला एसटी या प्रवर्गाचे आरक्षण संविधानाने दिले आहे, त्याची अंमलबजावणी करावी या प्रमुख मागणीसह पंढरपूर, लातूर व नेवासा येथे सुरू असलेल्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी संपूर्ण राज्यभर धनगर समाजाचे नेते आ. गोपीचंद पडळकर यांच्या आव्हानाला पाठिबा देत रस्ता रोको आंदोलन करण्यात येतो आहे. तसेच या सरकारने तात्काळ परिपत्रक काढावे या मागणीसाठी अंदोलकांनी जोर धरला. समाजाचा अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गाची अंमलबजावणी करून त्यांना आरक्षण देण्याची मागणी करत रस्त्यावर बसून आंदोलन केले.आम्ही राज्य सरकारकडे नवीन काहीही मागत नाही. आम्हाला फक्त पान २ वर...



# बीड आयटीआयला विनायकराव मेटेंचे नाव

## योगदान: राज्य मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

मंत्रालयात आज पार पडलेल्या मंत्रिमंडळ बैठकीत राज्यातील विविध जिल्ह्यात असलेल्या १४ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था म्हणजे आयटीआय यांचे नामकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार या महाविद्यालयांना महापुरुषांचे व संबंधित जिल्ह्यात योगदान दिलेल्या व्यक्तींचे नाव देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शासनाने १४ आयटीआय यांचे नामकरण करुन १४ महान व्यक्तींची नावेदेखील या आयटीआय संस्थेसाठी देऊ केली आहेत. यामध्ये बीडमधील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांचे नाव देण्यात आले आहे.

लोकनेते विनायकराव मेटे यांनी आपल्या हयातीमध्ये विद्यार्थ्यांसाठी अनेक लढे उभे केले. बीड मधील शासकीय आयटीआय महाविद्यालयाला नेहमीच त्यांनी सहकार्याची भूमिका ठेवली होती या ठिकाणी असलेल्या वस्तीगृहाचे पान २ वर...